क्रमांकः २०१०८/मविस/क-२ (संगणक)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन , मुंबई

दिनांक : २७/०९/२०२२

## :: परिपत्रक ::

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील कार्यालयीन दैनंदिन कामकाजात सुसूत्रता येण्यासाठी जसे नस्तींचा शोध घेणे, प्रलंबित नस्ती, टिपणी तयार करून ती वरीष्ठांपर्यंत पोहोचविणे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या रजेचा तपशील त्याचबरोबर शासकीय कामकाज गतीमान व्हावे, दस्तऐवज सुरक्षित व माहिती त्वरेने व जलद गतीने प्राप्त होऊन निर्णय प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी e-office प्रणालीचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयात e-office ही प्रणाली दैनंदिन कामकाजासाठी वापरात आणावयाची आहे. त्याबाबतचे आवश्यक प्रशिक्षण माहिती तंत्रज्ञान संचालनालयाद्वारे दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ रोजी दुपारी २.३० ते ४.३० वाजता मध्यवर्ती सभागृहात आयोजित करण्यात येत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमास या सचिवालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांची उपस्थिती आणि सहभाग अनिवार्य आहे, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

(अनिल महाजन)
सह सचिव (समिती) तथा वि.का.अ.
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रत :- १) मा. पिठासीन अधिकारी/ मा. उप पिठासीन अधिकारी/ मा. विरोधी पक्ष नेता (म.वि.प.) / मा. विरोधी पक्ष नेता (म.वि.स.) आणि मा. समिती प्रमुखांच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी

२) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष